मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# येशू वादळी समुद्राला शांत करतो



लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Janie Forest

रूपान्तरकार: Ruth Klassen

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2017 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.



येशू आणि त्याचे शिष्य मचव्यात बसून समुद्रातून प्रवास करत असतांना, समुद्रात मोठे वादळ उठले. या वादळामुळे गालिल समुद्र धुमचक्रीने झपाटला.



या प्रकारच्या
वादळाने
समुद्रातील
जहाजे फुटून
पाण्यात
बुडण्याची
शक्यता असते.

वादळामुळे शिष्य फारच घाबरले होते. लाटा मचव्यात येत होत्या, त्यामुळे मचवा पाण्याने भरत होता. परंतू येशू तर वादळात देखिल डोक्याखाली उशी घेऊन झोपले होते.



तेंव्हा शिष्य त्याला जागे करत ओरडून म्हणाले, "गुरुजी, गुरुजी, आम्ही बुडत आहोत !"

येशू त्याच्या शिष्यांना म्हणाला, "अहो, अल्पविश्वासी, तुम्ही भित्रे कसे?" मग त्याने घोंगावणाऱ्या वाऱ्याला थांबण्याची... आणि... गर्जणाऱ्या लाटांना शांत होण्याची आज्ञा केली.



आणि वादळ अगदी शांत झाले... समुद्र निवांत आणि स्तब्ध झाला. शिष्यांना आश्चर्य वाटले व ते म्हणाले, "हा कोणत्या प्रकारचा माणुस आहे की वारे व समुद्रहि ह्याचे ऐकतात !"



काही कालावधि नंतर, येशुचा अजून
एक व्यस्त दिवस गेला .५,000 पेक्षा
अधिक लोक एका रानातील
ठिकाणी येशूच्या
मागे–मागे गेले.





एका लहान मुलाने त्याच्यासाठी आणलेल्या जेवणाच्या डब्याचा वापर करुन देवाच्या कृपेने येशूने त्या सर्व लोकांना जेवू घातले. आणि आता संध्याकाळ झाली होती. येशूने त्या सर्वांना पाठवून दिले.

शिष्यांना देखिल जावे लागले. येशूने त्यांना मचव्यात बसवून त्याच्या आधि गालिल समुद्राच्या पलिकडे जाण्यास त्यांना सांगितले.





जेंव्हा त्याने सर्वांना त्याच्यापासून पाठवून दिले, तेंव्हा येशू स्वतः डोंगरावर एकांती प्रार्थना करावयास गेला. आणि रात्र झाल्यावरहि तो तेथे एकटाच होता.



समुद्रात वारा समोरुन असल्यामुळे शिष्य समुद्रातील वाऱ्यात अडकून पडले होते. पुष्कळ त्रास प्रयत्न करुन देखिल वाऱ्याने त्यांना समुद्रातील ...



... पाण्यातून प्रवास करण्यास थांबवून ठेवले होते. त्यांना मोठा आश्चर्याचा धक्का बसणार आहे, हे शिष्यांना माहित नव्हते.



सकाळच्या तिन
ते सहा वाजेच्या
दरम्यान, समुद्रातील
घोंगावणाऱ्या वाऱ्यात
शिष्यांनी काहितरी
पाहिले ज्यामुळे ते
फार घाबरले. आणि
ते भिऊन ओरडले,
"हे भूत आहे !"



परंतू तो तर त्यांचा
प्रभू आणि गुरु,
येशू होता, तो
पाण्यावरुन चालत
त्यांच्याकडे येत
होता.

येशू त्यांना म्हणाला,
"धीर धरा मी आहे;
भिऊं नका." तेव्हां
पेत्राने उत्तर दिले,
"प्रभूजी आपण असाल
तर पाण्यावरुन
आपणांकडे येण्यास
मला सांगा."



म्हणून येशूने
त्याला म्हटले, "ये."
तेंव्हा पेत्राने अगदी
साहसीपणे, मचव्यातून
पाण्यावर पाय टाकले,
आणि पाण्यावरुन
येशूकडे चालू लागला.





परंतू जेंव्हा त्याने
वाहणारा वारा
पाहिला, पेत्र
घाबरला, आणि
पाण्यात बुडू
लागला. तेंव्हा तो
ओरडून म्हणाला,
"प्रभूजी, मला
वाचवा !"



येशूने लगेच हात पुढे
करुन त्याला धारिले व
म्हटले, "अरे अल्पविशासी तूं
संशय का धरिलास?" आणि
मग जेंव्हा पेत्र व प्रभू येशू
मचव्यात चढले तेंव्हा
वारा पडला.



तेंव्हा जे कोणी त्या
मचव्यात होते ते आले
व त्याच्या पाया पडून
म्हणाले, "आपण खरोखर
देवाचे पुत्र आहात."



येशू वादळी समुद्राला शांत करतो

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

मत्तय ८, मत्तय १४, मार्क ४, लूक ८

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर ईश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची इच्छा अशी आहे की आम्ही त्याला ओळखावे.

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे, पण ईश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याने तुमच्या पापांसाठी शिक्षा मिळावी आणि क्रॉसवर मरण यावे म्हणून त्याच्या एकुलत्या पुत्राला येशूला पाठविले. नंतर येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गातल्या घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

जर हे सत्य आहे यावर तुम्ही
विश्वास ठेवता, तर ईश्वराला हे सांगा:

प्रिय येशू, तू ईश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मृत्यू भोगण्यास मनुष्य बनलास आणि आता तू पुन्हा जगतोस यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एक दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी निघेन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!
जॉन 3:16